MHSN020017622025

## वाणिज्य दावा क्र. २/२०२५ मधील
## नि.१६ खालील आदेश

प्रस्तुत अर्ज प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(अ)(ड) अन्वये सादर केलेला आहे.

२. प्रतिवादीने असे कथन केले आहे की, प्रस्तुत दावा वाणिज्य कायदयामधील तरतूदीनुसार दाखल केलेला आहे. त्यामुळे वाणिज्य कायदा कलम १२अ प्रमाणे पुर्तता करणेसाठी दावा दाखल करणेपूर्वी प्रकरण मध्यस्थी प्रक्रियेतून जाणे बंधनकारक आहे. परंतु दावा दाखल करणेपूर्वी वादीने मध्यस्थी प्रक्रिया अवलंबलेली नाही. वाणिज्य कायदा कलम १२अ चे पालन न करता दावा दाखल केला आहे. म्हणून प्रस्तुत वादपत्र दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे फेटाळणेस पात्र आहे. म्हणून त्याने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. वादींनी म्हणणे दाखल करुन अर्जास प्रखर विरोध केला आहे. वादींनी  असे कथन केले आहे की, प्रस्तुत दावा हिशोब होवून मिळणेकरीता व निरंतर मनाई हुकुमाकरीता दाखल केला आहे. वादींनी प्रतिवादीविरूध्द

तातडीची अंतरीम मनाई हुकूम मागितलेला आहे. त्यामुळे वाणिज्य कायदा कलम १२अ मधील तत्व दाव्यास लागू होत नाही. प्रतिवादीने प्रकरण लांबविण्याच्या उद्देशाने प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. म्हणून त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण होतात व त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादपत्र दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(अ)(ड) प्रमाणे फेटाळणेस पात्र आहे काय? | नाही. |
| २. | आदेश काय? | अर्ज नामंजूर करणेत येत आहे. |

## <u>कारणमीमांसा</u>

**मुद्दा क्र.१ करिताः**

५. प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, प्रस्तुत दावा वाणिज्य कायदयामधील तरतूदीनुसार दाखल केलेला असल्यामुळे त्यामधील कलम १२अ प्रमाणे पुर्तता करणेसाठी दावा दाखल करणेपूर्वी प्रकरण मध्यस्थी प्रक्रियेतून जाणे बंधनकारक आहे. परंतु दावा दाखल करणेपूर्वी वादीने मध्यस्थी प्रक्रिया अवलंबलेली नाही. वाणिज्य कायदा कलम १२अ चे पालन न करता

दावा दाखल केला आहे. म्हणून प्रस्तुत वादपत्र दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे फेटाळणेस पात्र आहे.

६. वादीतर्फे विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, प्रस्तुत दावा हिशोब होवून मिळणेकरीता व निरंतर मनाई हुकुमाकरीता दाखल केला आहे. वादींनी प्रतिवादीविरूध्द तातडीचा अंतरीम मनाई हुकूम मागितलेला असल्यामुळे वाणिज्य कायदा कलम १२अ मधील तरतूद दाव्यास लागू होत नाही. म्हणून त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

७. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. प्रतिवादीने असे कथन केले आहे की, वादीने वाणिज्य कायदा कलम १२अ नुसार दावा दाखल करणेपूर्वी मध्यस्थी प्रक्रिया अवलंबलेली नाही. म्हणून वाणिज्य कायदा कलम १२अ चे अवलोकन करणे गरजेचे आहे, ते खालीलप्रमाणे आहे –

***12A. Pre-Institution Mediation and Settlement—****(1) A suit, which does not contemplate any urgent interim relief under this Act, shall not be instituted unless the plaintiff exhausts the remedy of pre-institution mediation in accordance with such manner and procedure as may be prescribed by rules made by the Central Government.*

८. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ खालील अर्ज निकाली काढताना वादपत्रातील कथने विचारात घ्यावी लागतात. प्रस्तुत प्रकरणात वादीने तातडीचा अंतरिम मनाई हुकुम मागितलेला असल्यामुळे वाणिज्य दावा दाखल करण्यापूर्वी मध्यस्थी प्रक्रियेतून जाणे बंधनकारक नाही. दाव्याचे स्वरुप व नमूद तरतूद विचारात घेता प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांनी केलेला

युक्तीवाद स्वीकारणेजोगा नाही. वरील बाबी विचारात घेता अर्ज समर्थनीय नसल्यामुळे नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ करिताः**

९. वरील विवेचन व मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष विचारात घेता अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. परंतु वाणिज्य कायदयामधील नमूद तरतूदीचा उद्देश न्यायालयावरील कामाचा बोजा कमी करणे व दोन्ही पक्षकारांमध्ये सलोखा घडवून आणणे हा आहे. त्यामुळे उभयपक्षकारांना मध्यस्थी प्रक्रियेचा अवलंब करणे निर्देशित करणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने प्रकरण मध्यस्थी केंद्राकडे त्वरीत पाठवावे. सबब मी मुद्दा क्र.२ चे उत्तराकरिता खालील आदेश करीत आहे.

# आदेश

१. अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

२. प्रकरण मध्यस्थी केंद्राकडे त्वरीत पाठवावे.

SHAKTI UTTAMRAO DESHMUKH

Digitally signed by SHAKTI UTTAMRAO DESHMUKH
Date: 2025.12.01 17:41:25 +0530

सांगली. (श. उ. देशमुख)

दि.०१/१२/२०२५ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, सांगली

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | ***K. U. Nadaf*** |
| Court | : | Civil Judge Sr.Dn., Sangli. |
| Date of order/judgment | : | 01/12/2025 |
| Signed by the Presiding Officer on | : | 01/12/2025 |
| Uploaded on | : | 01/12/2025 |